# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-३१२३/प्र.क्र.१४०/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - ०८ मे, २०२३

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-अमरावती
अमरावती-नांदगाव- मोर्शी- वरूड- पांढूर्णा या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी अमरावती जिल्ह्यातील १४.९७९ हे. वनजमीन वळती करण्याबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/अमरावती/ID-१२६९५/२९७/२०२३-२४, दि.२६.०४.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

(१) प्रस्तुत प्रकरणी १४.९७९ हे. वनजमिनीचे वळतीकरण प्रस्तावित आहे. त्यामुळे पर्यायी वनीकरणासाठी वळती होणा-या वनजमिनीच्या दुप्पट अवनत वनक्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करणे आवश्यक आहे. मात्र, केंद्रस्थ अधिकारी यांच्या पत्रात पृष्ठ क्र. ३ येथे मौ.मोलविहिर, ता. वरूड, जि. अमरावती येथील वनजमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करीत असल्याचे नमूद आहे. त्यामध्ये नेमकी किती जमीन पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे याचा उल्लेख नाही. तर सदर पत्रातील पृष्ठ क्र. ७ येथे मौ. पांढरेवाडी, ता. दौंड, जि. पुणे येथील ग. नं. ५७७ मधील १३.९३५ हे. अवनत वनजमीन प्रस्तावित करण्यात येत असल्याचे नमूद आहे.

त्यामुळे या प्रकरणी पर्यायी वनीकरणासाठी नेमकी कोणती व किती अवनत वनजमीन प्रस्तावित करण्यात येत आहे याचा बोध होत नाही. याबाबत आपल्या स्वयस्पंष्ट अभिप्रायासह माहिती सादर सादर करावी.

(२) प्रस्तावित वनजमीन वन्यजीव / व्याघ्र भ्रमणमार्गाचा भाग आहे किंवा कसे? प्रस्तुत प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत, याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन